## संक्षिप्त वृत्त



योग प्रशिक्षकांचा सत्कार करताना सुमित भोसले व इतर.

### जय हिंद लोक चळवळीच्यावतीने योग प्रशिक्षकांचा सन्मान

**सोलापूर** : जागतिक योग दिनाचा औचित्य साधून जय हिंद लोक चळवळ सोलापूरच्यावतीने कवठे येथील श्री संत गाडगेबाबा आश्रम शाळा येथे विद्यार्थ्यांसाठी योग स्पर्धा संपन्न झाली. यावेळी योगा प्रशिक्षकांचा सन्मानही करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जय हिंद लोकचळवळीचे सुमित भोसले, संस्थेच्या उपाध्यक्ष लक्ष्मी पाटील, सचिव गणेश पाटील, अक्षय पाटील, शैला पाटील, आदित्य पाटील, योग प्रशिक्षक अनिता कोडमूर आदींची उपस्थिती होती. यावेळी सुमित भोसले यांनी योगाचे महत्त्व सांगितले.

स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना आकर्षक बक्षीस देण्यात आली. यावेळी योग प्रशिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास सुर्या धप्पाधुळे, सुहास मस्के व स्नेहल भोसले, झिशान मुजावर, दिपक धामूरे, अनिरुध्द दहिवडे, लक्ष्मीकांत शिवशेट्टी, रमजान पाटील, अमोल कोटगोंडे व सुनिल अरवत आदी उपस्थित होते.



मुख्याध्यापक सहविचार सभेचे उद्घाटन करताना आ.आवताडे

### वृक्षसंवर्धन चळवळ काळाची गरज : आ. समाधान आवताडे

**पंढरपूर** : वाढत्या औद्योगिकीकरणामुळे दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. तो थांबवण्यासाठी वृक्ष लागवड, संवर्धन काळाची गरज असल्याचे प्रतिपादन आ. समाधान आवताडे यांनी केले. मंगळवेढा येथील उदयसिंह मोहिते-पाटील इंग्लिश मेडियम स्कूल येथे आयोजित मुख्याध्यापक सहविचार सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर पंचायत समिती गटविकास अधिकारी योगेश कदम, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, राजन पाटील, शिक्षणाधिकारी डॉ. बिभिषण रणदिवे, डॉ. नंदकुमार शिंदे, प्राचार्य सुधीर पवार आदी उपस्थित होते. मंगळवेढा तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांची एकूण संख्या ४१००० हजाराच्या आसपास असून विद्यार्थी संख्या एवढीच झाडे आपण तालुक्यातील सर्वच शाळांमार्फत वृक्षारोपण करण्याचा संकल्प हाती घेतला आहे, असेही आवताडे म्हणाले. कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, गट शिक्षणाधिकारी डॉ. बिभिषण रणदिवे व अविनाश सुर्वे यांनीही आमदार आवताडे यांच्या या समाजाभिमुख चळवळीत सामील होण्याचे आवाहन केले आहे. कार्यक्रमासाठी तालुक्यातील मान्यवर, विविध शाळांचे मुख्याध्यापक, तालुका शिक्षण विभागातील पदाधिकारी आणि पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

# महापालिकेने मान्सूनपूर्व कामे केल्याचा दावा फोल

## ● पावसामुळे अनेक रस्त्यांवर खड्डेच खड्डे

**सोलापूर/प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसात झालेल्या पावसामुळे रस्त्यांची चाळण झाली आहे. अनेक ठिकाणी रस्त्यावरील डांबर वाहून गेल्यामुळे खड्डे पडले आहेत. खड्ड्यात साठलेल्या पावसाच्या पाण्यामुळे वाहनधारकांची कसरत होत आहे. पादचाऱ्यांना खड्ड्यांचा मोठा फटका बसत आहे. वेगाने वाहन जवळून गेल्यावर खड्ड्यातील घाण पाणी अंगावर उडत चालल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. दुसरीकडे महापालिकेने मान्सूनपूर्व कामे केल्याचा दावा फोल ठरला आहे.**



सोलापूर शहरात गेल्या आठ- दहा दिवसांपूर्वी सलग दोन दिवस मोठा पाऊस झाला. त्यानंतर पावसाची एक दिवसाआड संततधार सुरू आहे. या पावसामुळे शहरातील रस्ते मात्र खराब झाल्याचे दिसून येत आहे. शहरातील कोंतम चौक, मंगळवार बाजार, कन्ना चौक, जोडबसवण्णा ते पोटफाडी चौक, सात रस्ता ते मौलाली चौक, जेलरोड ते किडवाई चौक, जुना बोरामणी नाका, दयानंद कॉलेज ते सम्राट चौक, बुधवार बाजार, भारतीय चौक, विजापूरवेस, कल्पना टॉकीजमार्गे जुनी पोलीस लाईन रस्ता, आमराई अंतर्गत रस्ते, नवीपेठ अंतर्गत रस्ते या मार्गावर खड्डेच खड्डे आहेत. खड्डे पडलेले हे रस्ते सखल भागातील आहेत. या रस्त्यांवर पावसाचे पाणी साचत आहे. त्यामुळे वाहनधारकांना खड्ड्यांचा अंदाज येत नाही. त्यामुळे अपघाताला निमंत्रण मिळत आहे.

मे महिन्यात पालिका आयुक्तांनी मान्सूनपूर्व कामे ९० टक्के झाल्याचा दावा केला होता. त्याअंतर्गत शहरातील अंतर्गत रस्त्याचे खड्डेही बुजवल्याचे स्पष्ट केले होते.

मात्र शहरातील परिस्थिती पाहली तर आयुक्तांचा हा दावा फोल ठरल्याचे दिसत आहे. शहरातील खराब रस्त्यांबाबत विविध पक्ष, संघटना वेळोवेळी आवाज उठवत असतात. शिवसेनेच्या ठाकरे गटाने तर रस्त्यावर ड्रेनेज व खड्ड्यांच्या बाजूला सावधान ! पुढे खड्डा आहे ! असा इशारा पेंटिंग करत दिला आहे. आता महापालिका याचा किती गांभिर्याने विचार करते हे पहावे लागेल.

नोकरीनिमित्त दुचाकीवरून दररोज प्रवास करावा लागतो. पावसामुळे नव्याने खड्डे झाल्याचे दिसत आहे. अवजड वाहनामुळे खड्डे वाढत चालले आहेत. महापालिकेने खड्ड्यांचा वेळीच बंदोबस्त करावा.

**- विनोद कल्याणकर,**
नागरिक.

शहरातील अनेक रस्ते खराब झाले आहेत. नवीपेठ आणि किडवाई चौकातून तर दुचाकीवरून जाताना कसरत करावे लागते. या मार्गावर खड्ड्यात पाणी साचले असून त्यामुळे अपघात होत आहेत. महापालिकेने लवकर हे खड्डे बुजबावेत.

**- नागेश जमदाडे,**
नागरिक.

# दोन धामण सापांची वर्चस्वासाठी तासभर लढाई


## ▶▶ केगाव येथील घटना;
## ▶▶ युवकांनी केले व्हिडिओ चित्रिकरण

**सोलापूर/प्रतिनिधी**

उत्तर तालुक्यातील केगाव येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास कुणाल दळवी यांच्या शेताच्या बाजूला दोन धामण सापांचे युद्ध सुमारे तासभर सुरू होते. दोघांमध्ये वर्चस्वासाठी लढाई सुरू असल्याचे दिसून आले. काहीजण आपल्या मोबाईलमध्ये याचे व्हिडिओ चित्रिकरण केले.

मार्च ते जुलैच्या दरम्यान धामण सापांच्या मिलनाचा काळ चालू असतो. मादीला आकर्षित करण्यासाठी दोन किंवा तीन नर युद्ध करतात. हाच असाच प्रकार केगाव येथे दिसून आला. सर्पमित्र संतोष धाकपाडे, सुरेश क्षीरसागर, योगेश चवरे, रोहित गावडे यांना घटना कळताच त्यांनी पाहणी केली. साधारण साडेसहा ते सात फूट लांबीचे दोन धामण बिनविषारी सापांचे द्वंद्व युद्ध चालू असल्याचे लक्षात आले. क्षीरसागर हे त्या दोन सापांना पकडण्यासाठी म्हणून हळूहळू पुढे सरकत होते. त्या दोन धामण नरास याची चाहूल लागली. लगेचच पळून जाण्यासाठी दोघे वेगळे झाले.

वेगळे झालेले पाहताच अलगदपणे हाताने पकडून पिशवीमध्ये बंद करण्यात आली. दोन्ही साप पकडल्यानंतर परत जवळच काही



अंतरावर असलेल्या माळरानावर निसर्गाच्या सानिध्यात सोडून देण्यात आले. मार्च ते जुलैच्या दरम्यान धामण सापांच्या मिलनाचा काळ चालू असतो. मादीला आकर्षित करण्यासाठी दोन किंवा तीन नरांना युद्ध करतात. चावा न घेता फक्त आपल्या ताकदीने फक्त खाली पाडण्याचा प्रयत्न करतात. जो नर धामण जिंकेल तो त्या परिसरातील मादीबरोबर मिलन करून पुढची प्रजावळ वाढवतो, असे सर्प मित्रांनी सांगितले.

# ठाकरे गटाकडून आज गणवेश प्रश्नावर आंदोलन

**सोलापूर/प्रतिनिधी**

राज्यातील शिंदे, फडणवीस व पवार महायुती सरकार प्राथमिक शालेय गणवेश अद्यापी विद्यार्थ्यांना दिलेले नाही. त्यामुळे शैक्षणिक गुणवत्ता खालावला आहे. या सरकारचे जाहीर निषेध नोंदवण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्यावतीने सोमवार, २४ रोजी जुना जिल्हाधिकारी कार्यालय समोर निदर्शने करण्यात येणार आहे, अशी माहिती सोलापूर महानगर प्रमुख विष्णू कारमपुरी यांनी दिली आहे.

प्राथमिक शालेय गणेश वाटप योजना अपयशी झाली आहे. गणवेश वेळेवर न मिळाल्याने प्राथमिक विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होऊ शकतो.

गणवेश तयार करण्याचा ठेका महाराष्ट्र शासनाने एका गुजराती कंपनीला दिल्याचे उघडकीस आले आहे. म्हणून राज्यातील महायुती सरकारच्या निषेध नोंदविण्यासाठी निदर्शने करण्यात येणार असल्याचे कारमपुरी यांनी सांगितले. यावेळी कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन कारमपुरी यांनी केले आहे.



खा. मोहिते पाटील यांना निवेदन देताना शिक्षक दिसत आहेत.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कक्षेत आणा

## खा. मोहिते-पाटील यांना युनियनचे निवेदन

**सोलापूर/प्रतिनिधी**

केंद्र शासनाने महाविद्यालयीन प्राध्यापकाप्रमाणेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कक्षेत आणावे, अशी मागणी सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनने केली आहे.

माढा लोकसभेचे खासदार धैर्यशील मोहिते- पाटील यांना कॉलेज कर्मचारी युनियन सोलापूरच्यावतीने अकलूज येथे हे निवेदन देण्यात आले. यात या प्रमुख मागणीचा या निवेदनात समावेश होता. आपण लोकसभेत हा प्रश्न मांडू, असे आश्वासन खासदार मोहिते पाटील यांनी यावेळी दिले.

यावेळी कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, खजिनदार राहुल कराडे, सिनेट सदस्य अजितकुमार संगवे, युनियनचे माजी चेअरमन अण्णा गवळी, संगमेश्वर महाविद्यालयाचे राजेंद्र तोळनूर, चंद्रकांत खानापुरे, चिदानंद स्वामी, महाडिक महाविद्यालय मोडनिंबचे सुरेश वाघमारे, विजय कोळी, सुनीता काटे, रमजान शेख, दीपक शिंदे, भारत पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

# सैनिकी मुलां-मुलींना वसतिगृह प्रवेशासाठी रविवारपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर/प्रतिनिधी**

सैनिकी मुलां-मुलींसाठी वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली असून, इच्छुक माजी सैनिक विधवा पत्नीचे पाल्य, विर पत्नीच्या पाल्यांना व सैनिकांच्या अनाथ पाल्यांना वसतिगृह प्रवेशासाठी संबंधित वसतिगृह अधीक्षक किंवा अधीक्षिका यांच्याकडे ३० जूनपर्यंत अर्ज जमा करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

आजी माजी सैनिकांच्या पाल्यांना वसतिगृहात सवलतीच्या दरात निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच माजी सैनिक विधवा पत्नीचे पाल्य, विर पत्नीच्या पाल्यांना व सैनिकांच्या अनाथ पाल्यांना वसतिगृहात नि:शुल्क भोजनाची व निवासाची सोय उपलब्ध आहे. तरी ज्या आजी व माजी सैनिकांचे तसेच सैनिक विधवांचे व विर पत्नीचे पाल्य सोलापूर येथील शैक्षणिक संस्थेत इ.८ वी ते पुढील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत आणि जे वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छितात त्यांनी वसतिगृह अधिक्षक व अधिक्षिकांकडून अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक मुलींचे वसतिगृह दूरध्वनी क्रमांक- ०२१७-७२३०१७७८ मो. क्र. ९५२७५८४०३४ व मुलांचे वसतिगृह दूरध्वनी क्रमांक- ०२१७-७२३०२२२८ मो. क्र. ७९०६५८३०३७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# अतुल खुपसे यांच्या कृतीचा काळ्या फिती लावून निषेध

**सोलापूर** : जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष अतुल खुपसे यांनी पुनम गेट, जिल्हा परिषद येथे बेकादेशीररित्या प्रति अधिकारी खुर्चीत बसवून त्यास तोंडास काळे फासून भारतीय चलनी नोटाची उधळपट्टी केली आहे. खुपसे यांच्या कृतीचा काळ्या फिती लावून प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी निषेध करीत घोषणाबाजी केली.

या घटनेमुळे अधिकारी कर्मचारी यांच्या भावना अत्यंत तीव्र असून, अशा प्रकारे बेकायदेशीर आंदोलन करुन अधिकाऱ्यांवर दबाब निर्माण करण्याचा व मानसिक खच्चीकरण करणाऱ्या प्रवृत्तीच्या विरोधात सार्व. बांधकाम विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी काळया फिती लावून निषेध केला. सात रस्ता येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे आवारात निषेध सभा घेतली. या आंदोलनास महसूल कर्मचारी संघटना, आरोग्य कर्मचारी संघटना, समाज कल्याण सोलापूर जिल्हा चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटना, राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनांनी पाठिंबा दिला.

# निरोगी आरोग्यासाठी विषमुक्त सेंद्रिय शेती काळाची गरज : डॉ. तांबडे

## गवळी वस्ती तालीम संघातर्फे कृषिनिष्ठ शेतकऱ्यांचा सन्मान

**सोलापूर/प्रतिनिधी**

निरोगी आरोग्यासाठी विषमुक्त सेंद्रिय शेती काळाची गरज असून शेतकऱ्यांनी आता भविष्याचा वेध घेऊन शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याबरोबरच सेंद्रिय शेतीकडे वळणे गरजेचे असल्याचे मत, सोलापूरच्या कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. लालासाहेब तांबडे यांनी व्यक्त केले.

गवळी वस्ती तालीम संघ मानाचा गणपती यांच्यावतीने खरीप व रब्बी हंगाम पीक लागवड तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन आयोजित केले होते, त्यावेळी डॉ. लालासाहेब तांबडे बोलत होते. प्रगतशील शेतकरी प्रतापसिंह परदेशी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. ॲक्सिस बँकेचे सोलापूरचे




एरिया सेल्स मॅनेजर भगवान बनसोडे यांचेही यावेळी बँकेच्या शेती कर्ज विषयाबाबत सविस्तर मार्गदर्शन झाले. कार्यक्रमाच्या निमित्ताने शेजबाभळगावचे कृषिभूषण शेतकरी शशिकांत पुदे, कामतीचे द्राक्ष बागायतदार प्रताप पाटील, कुरुलचे केशर आंबा उत्पादक शेतकरी समाधान वाघमोडे, औज येथील केळी व पपई उत्पादक शेतकरी आशिष पाटील, कोथाळे येथील कारले उत्पादक शेतकरी रवींद्र पवार यांच्यासह वृक्षमित्र मनोज देवकर यांचा कृषीनिष्ठ शेतकरी म्हणून पाहुण्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्रारंभी मार्गदर्शक हेमंत पिंगळे यांनी कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश सांगितला. या कार्यक्रमास नामदेव पवार, गवळी वस्ती तालीम संघाचे अध्यक्ष महादेव गवळी, अरुण घुले, वामन वाघचौरे, औदुंबर जगताप,नागनाथ पवार उपस्थित होते.

# डीएड प्रवेशाकडे विद्यार्थ्यांनी फिरवली पाठ

## ▶▶ प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के सुद्धा अर्ज नाही
## ▶▶ अर्ज करण्याची मुदत वाढवली

**सोलापूर/प्रतिनिधी**

इयत्ता बारावीच्या निकालानंतर सर्वत्र प्रवेशाची लगबग सुरू असताना डीएड प्रवेशासाठी मात्र विद्यार्थ्यांनी पाठ फिरविल्याची स्थिती आहे. डीएड प्रवेशासाठी अर्ज करण्याची मुदत पहिल्यांदा १८ जूनपर्यंत होती, मात्र प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के सुद्धा अर्ज न आल्याने आता २५ जूनपर्यंत मुदतवाढ द्यावी लागली आहे.

बारावीनंतर अभियांत्रिकी, फार्मसी, बीएससी, बी-कॉम, स्पर्धा परीक्षेसाठी काहीजण बीए अशा अभ्यासक्रमांना आवर्जून प्रवेश घेत आहेत. मात्र, एकेकाळी बारावीनंतर विज्ञान, वाणिज्य, कला अशा तिन्ही शाखांमधील टॉपर विद्यार्थ्यांच्या पसंतीचे डीएड आता ६० ते ६५ टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना देखील नकोसे वाटू लागले आहे.

वेळेवर नसलेली शिक्षक भरती आणि दरवर्षीची संचमान्यता, इंग्रजी शाळांकडे विद्यार्थ्यांचा वाढलेला कल व कमी पटसंख्येमुळे अतिरिक्त होणारे शिक्षक आणि पटसंख्या टिकविण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हीच त्याची कारणे आहेत. आजही टोल नाका, तलाठी, ग्रामसेवक, लिपिक, शिपाई अशा पदांवर डीएड-बीएड पदवीधारक विद्यार्थी पाहायला मिळतात. या पार्श्वभूमीवर यंदा डीएड प्रवेशासाठी २५ जूनपर्यंत मुदत असली, तरीदेखील प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के सुद्धा अर्ज प्राप्त झालेले नाहीत. जिल्हा परिषदेसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांमधील शिक्षक भरती वगळता खासगी अनुदानित शैक्षणिक संस्थांमध्ये नोकरीसाठी गेल्यावर डीएड-बीएडमध्ये टॉपर असलेल्या विद्यार्थ्यालासुद्धा डोनेशन द्यावेच लागते, असे बोलले जाते.

शिक्षकाची जागा रिक्त झाल्यानंतर मुलाखतीसाठी बोलावले जाते, त्यावेळी तुम्हाला काय येते यापेक्षा डोनेशन किती देवू शकता, हाच पहिला प्रश्न विचारला जातो, ही वस्तुस्थिती आहे. आता खासगी अनुदानित संस्थांमधील शिक्षक भरतीदेखील पवित्र पोर्टलद्वारेच होत असून एका जागेसाठी दहा उमेदवारांना त्याठिकाणी मुलाखतीसाठी पाठविले जाते. त्यावेळी त्याठिकाणी उमेदवारांची निवड कोणत्या निकषांवर होते हे स्पष्ट होत नाही. त्यामुळे या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला आहे.



### पहिल्याच यादीत प्रवेश प्रक्रिया संपण्याची शक्यता

१५ जुलैपासून डीएडचे प्रथम वर्ष सुरू होणार असून तत्पूर्वी प्रवेशाच्या तीन गुणवत्ता याद्या प्रसिद्ध होतील. परंतु अर्जाची संख्या पाहता पहिल्याच यादीत प्रवेश प्रक्रिया संपेल, अशी सद्यः स्थिती आहे. दोन वर्षे शिकूनही पुन्हा १५ ते २५ लाखांपर्यंत डोनेशन द्यावे लागते, अशी भीती तरूणांच्या मनात आजही आहे. त्यामुळेच डीएड-बीएडकडे विद्यार्थ्यांचा कल कमी झाल्याचे जाणकार सांगतात.

# कारखान्यांना गळीत नियोजनाची माहिती ऑनलाइन भरावी लागणार

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्यात गळीत हंगामास सुरुवात होते. जिल्ह्यातील ३५ ते ३७ साखर कारखान्यांना आपले नियोजित गळीत, गाळप उद्दिष्ट, ऊस क्षेत्र व इतरांबद्दल सविस्तर माहिती सीआरएम पोर्टलवर भरून सादर करायची आहे. हंगाम पूर्वी सादर न केल्यास गाळप परवाना दिला जाणार नसल्याचे सहसंचालक विभागाच्यावतीने सांगण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील ३५ ते ३७ साखर कारखान्यांनी गाळप हंगाम २०२४ ते २०२५ मधील ऊस नोंदणीची माहिती महाऊस पोर्टल (सीआरएम) ऊस उत्पादन, ऊस गाळप, साखर उत्पादन याबद्दल चुकीची माहिती होऊ नये यासाठी अचूक माहिती भरणवी, साखर आयुक्त कार्यालयातर्फे तयार करण्यात आलेल्या पोर्टलवर सविस्तर नोंदी करावी लागणार आहे.

अपलोड केलेली माहिती ही गाळप परवान्यासाठी ग्राह्य धरली जाईल. एकदा भरलेली माहिती पुन्हा भरली किंवा डिलीट होणार नाही. सविस्तर माहिती भरावी अन्यथा २४ -२५ हंगामातील गाळप परवाना दिला जाणार नाही, असे ही कळविण्यात आले आहे. १६ जूनपर्यंत माहिती महापोर्टलवर नोंदणी करण्याची अंतिम तारीख जरी असली तरी देखील अजूनही कारखाने माहिती अपलोड करू शकतात असे कळवले आहे.